दिनांक ०६/०८/२०१४ रोजी झालेल्या आरोग्य समिती सभेचे इतिवृत्त

आरोग्य समितीची सभा दिनांक ०६/०८/२०१४ रोजी दुपारी १.०० वाजता मा.श्री मनमोहनसिंग अमरसिंग चव्हाण सभापती आरोग्य व शिक्षण समिती यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आली. सभेस खालील सन्मा.सदस्य व अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

–: सर्व श्री. सन्माननीय :–

| अक्रं | उपस्थित सर्व सन्मा सदस्य यांची नांवे | पद |
|---|---|---|
| १ | मा.श्री.मनमोहनसिंग अमरसिंग चव्हाण | सभापती |
| २ | सन्मा.सौ.ज्योतीताई जिवनराव ठेंगे | सदस्य |
| ३ | सन्मा.प्रविण बाबारावजी उईके | सदस्य |
| ४ | सन्मा.सौ.सुलोचनाताई मो. भोयर | सदस्य |
| ५ | सन्मा.श्री.पंढरीभाउ हरिभाउ सिंहे | सदस्य |
| ६ | सन्मा.सौ. आरतीताई हरिभाउ फुपाटे | सदस्य |
| ७ | डॉ.डि.टि.रणमले | सचिव तथा जिआअ |

–: अधिकारी व निमंत्रीत:–

| अक्रं | अधिकारी व कर्मचारी यांचे नांव | पद |
|---|---|---|
| १ | श्री.अ.ल.नितनवरे | क.अ.बा.वि क्रमांक २ जि.प. यवतमाळ |
| २ | डॉ.एस.एम. तरोडेकर | जिल्हा हिवताप अधिकारी यवतमाळ |
| ३ | डॉ.मोहन खडतकर | ताआअ बाभुळगांव |
| ४ | डॉ.के. आर. गुजर | वै.अ सहा.संचालक (कुष्ठरोग) कार्यालय |
| ५ | डॉ.विरेंद्र श्रीवास्तव | ताआअ महागांव |
| ६ | डॉ.अविनाश देशमुख | ताआअ कळंब |
| ७ | डॉ संजय जिद्येवार | ताआअ राळेगांव |
| ८ | डॉ.आशिष पवार | ताआअ पुसद |
| ९ | डॉ.एस.एम.मडावी | ताआअ झरी |
| १० | डॉ.संजय तोडासे | ताआअ वणी |
| ११ | डॉ.रविंद्र दुर्गे | ताआअ नेर |
| १२ | डॉ.सुषमा खोडवे | ताआअ यवतमाळ |
| १३ | डॉ.सि.एस.भोंगाडे | ताआअ दिग्रस |
| १४ | डॉ.विजय गांवडे | ताआअ मारेगांव |
| १५ | डॉ. उमेश मडावी | ताआअ आर्णी |

| | | |
|---|---|---|
| १६ | डॉ.गोपाळ पाटिल | ताआअ पांढरकवडा |
| १७ | डॉ.पि. डी. देशमुख | .ताआअ उमरखेड |
| १८ | डॉ.विलास नवरंगे | ताआअ दारव्हा |
| १९ | श्री.एस.एम. सवने | मु.अ.शा.जि.आ. प्रयोगशाळा |
| २० | श्री.लिलेश साखरवाडे | उपअभियंता बांधकाम एनआरएचएम |
| २१ | श्री.जि.एस. भारशंकर | शा.अ.विद्युत बा.वि. क्रमांक २ जि.प |
| २२ | श्री.ए.ए.धकाते | शा.अ.विद्युत बा.वि. क्रमांक १ जि.प |
| २३ | डॉ.पि. डी. देशमुख | .ताआअ उमरखेड |
| २४ | डॉ.विजय उमरे | ताआअ घांटजी |
| २५ | श्री.राहुल मनियार | डिपीएम एनआरएचएम |
| २६ | श्रीमती एस.ए.लिचडे | पिसिपिएनडीटी |
| २७ | श्रीआरएल.मशरू. | शा.अ.बा.वि. क्रमांक १ जि.प. यवतमाळ |
| २८ | श्री.बी.आर. देवतळे | नेत्रचिकित्सा अधिकारी |
| २९ | कु.सुजाता बोरकर | सिकलसेल कोऑडिनेटर |
| ३० | श्री.अरूण नक्षणे | स्विय सहायक मा. सभापती आ.समिती |
| ३१ | श्री.ऐ.के. गावंडे | व.सहा आरोग्य विभाग नियोजन शाखा |
| ३२ | श्री.प्रदिप काळेकर | शा.अ एनआरएचएम आ.विभाग |
| ३३ | श्री.व्ही.जी.चहाकर | आ.सहा.सभा शाखा आ.विभाग |
| ३४ | श्री.डी.एम. ठाकरे | आ.सहायक आरोग्य विभाग |

सर्वप्रथम सचिव तथा अति.जि.आ.अ यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले.स्वागत केल्यांनतर मा. अध्यक्ष यांचे परवानगीने विषय पत्रिकेवरील विषयानुसार सभेला सुरूवांत केली.

विषय क्रमांकः—१ :—दिनांक १९.०७.१४ रोजी झालेल्या आरोग्य समिती सभेच्या अहवालांचे वाचन करणे व त्यांस कायम करून मंजुरात प्रदान करणे बाबत

दिनांक १९.०७.२०१४ रोजी झालेल्या आरोग्य समिती सभेच्या अहवालाच्या प्रती सर्व उपस्थित सन्मा सदस्यांना देण्यांत आल्या ,अहवालांचे वाचन सपल्यानंतर सन्मा.सदस्यांनी खालील मुद्दे उपस्थित करून चर्चा केली व मा. सभापती आरोग्य समिती यांनी सचिव तथा जिआअ यांना आवश्यक ते निर्देश दिले.

१) सन्मा. सौ.सुलोचनाताई भोयरः—यांनी उपकेंद्र बांणगांव येथील कामा बाबत विचारणा करून त्वरीत काम सुरू करण्यांबाबत कार्यवाही करावी अशी माहिती सभागृहांत दिली.

यावंर मा.सभापती आरोग्य समिती यांनी सदर कामाचे इस्टिमेंट अद्यावत करून आजचे सभेत मंजुर करून घेण्यांबाबत शा.अ बा. वि. क्रमांक २ व नियोजन शाखा,आरोग्य विभाग यांना निर्देश दिले.

तसेच उपकेंद्र चिकणी (डोमगा)येथील जागे बाबत दोन वर्षापासुन कोणतीच प्रगती झालेली नाही अशी माहिती सभागृहास सादर केली.

यावर मा. सभापती आरोग्य समिती यांनी,उपकेंद्र चिकणी (डोमगा)येथील जागेबाबतचा प्रश्न तहसिलदार व एसडीओ यांचे कडे प्रलंबीत आहे असे सांगुन ताआअ नेर यांनी सदर कामांत सन्मा. सदस्यांची मदत घेउन पाठपुरावा करण्या बाबत निर्देश दिले.

२) सन्मा. श्री.प्रविण उईके :– यांनी प्राआकेंद्र बेलोरा ता.यवतमाळ येथील इमारतीचे त्वरीत निर्लेखना बाबत कार्यवाही करून नविन प्राआकेंद्र इमारत बांधणे बाबत कार्यवाही करून नविन प्रा.आ.केंद्र इमारत बांधण्यांत यावी अशी माहिती सभागृहांत दिली.

यावंर मा.सभापती आरोग्य समिती यांनी प्राआकेंद्र बेलोरा येथील निर्लेखन करण्याबाबत शा.अ बा. वि.क्रमांक १यांना निर्देश दिले

३) सन्मा. श्री.पंढरीभाउ ह. सिंहे :–यांनी ,प्राआउपकेंद्र सिंगद ता. दिग्रस हे रेडझोन मध्ये येत असल्यामुळे सदर उपकेंद्र इतर जागेवर बांधण्याबाबत कार्यवाही करावी या करिता जागा प्रस्तांव तयार करावा अशी माहिती सभागृहांस दिली.

यावर मा. सभापती आरोग्य समिती यांनी सदर प्रकरणी कार्यवाही करण्यांचे निर्देश शा.अ बा.वि. क्रमांक २ व नियोजन शाखा आरोग्य विभागास दिले.

त्याचप्रमाणे प्राआकेंद्र/उपकेंद्र इमारत बांधणे बाबत जागा उपलब्ध नसेल तर ग्रा.प./शासनानी उपलब्ध करून द्यावयास पाहीजे.जागा मिळत नसेल तर शासनाने विकत घेउन जागा उपलब्ध करून दिली पाहीजे असें सभागृहांत प्रतिपादन करून या करिता आरोग्य विभागांनी शासनास तसे कळवावे असे सांगीतले.

यावर मा. सभापती आरोग्य समिती यांनी सदर प्रकरणी कार्यवाही करण्यांचे निर्देश नियोजन शाखा आरोग्य विभागास दिले

त्याचप्रमाणे उपकेंद्र रामगांव व साजेगांव येथील जागेचा प्रश्न ब–याच दिवसापासुन प्रलंबीत आहे जागा मिळत नसेल तर दुस–या गांवात सदर उपकेंद्र मंजुर करण्यांत यावे अशी माहिती देउन सदर जागेचा प्रश्न सोडविण्याबाबत कार्यवाही करावी असे सांगीतले.

यावर मा. सभापती आरोग्य समिती यांनी, ता.आ.अ दारव्हा यांना सदर प्रकरणी पाठपुरावा करण्या बाबत निर्देश दिले

तसेच उपकेंद्रातील श्रीमती भगत एएनएम यांचेवर कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले.त्याचप्रमाणे डॉ. वाढवे यांना, जोपर्यंत दुसरे वै.अ प्राआकेंद्रास मिळत नाही तोपावेतो त्यांना कार्यमुक्त करण्यांत येउ नये अशी सुचना मा. सभापती आरोग्य समिती यांनी ताआअ दारव्हा यांना केली

तसेच सन्मा. सदस्यांनी प्राआउपकेंद्र लाडखेड येथील इमारतीचे आवारांत झाडे वाढलेली आहे तेंव्हा आवारांत असलेली झाडे तोडण्या बाबत बांधकाम विभागाकडुन कार्यवाही करावी. अशी माहिती सभागृहांस देउन कार्यवाहीची मागणी केली

यावर मा. सभापती आरोग्य समिती यांनी सदर प्रकरणी कार्यवाही करण्यांचे निर्देश शा.अ बा. वि. क्रमांक २ यांना दिले.

तसेच सन्मा. सदस्यांनी दारव्हा तालुक्यांतील रामगांव व साजेगांव येथे जागेचा प्रश्न निर्माण झालेला आहे तेंव्हा सदर उपकेंद्र उपरोक्त गावाऐवजी दुस–या गांवात उपकेंद्र बांधण्यां बाबत तसा ठराव घेउन शासनांस सादर करावा अशी माहिती दिली यावर सभागृहांत सविस्तर चर्चा होउन मा. अध्यक्षांनी खालील प्रमाणे ठरांव मांडला.

ठरांव क्रमांक १:– उपकेंद्र बांधण्याकरिता ग्रामप्रंचायत जागा उपलब्ध करून देत नसेल,जागेत बांधकाम करण्याकरिता नाहरकत प्रमाणपत्र देत नसेल तर सदर गावाऐवजी दुस–या गावांत किंवा जागा बदलुन दुसरी जागा उपलब्ध करून देण्याबाबत ताआअ यांनी कार्यवाही करावी याबाबत सभागृहांत एकमत होउन सदर विषय शासनास कळविण्याबाबत हि सभा सर्वानुमते मंजुरात प्रदान करते

ठरांवावर कोणतीही उपसुचना आली नाही व ठरांव सर्वानुमते मंजुर करण्यांत आला.

सुचक :–सन्मा.श्री.पंढरीभाउ ह. सिहें
अनुमोदन: सन्मा.सौ.ज्योतीताई जि. ठेंगे

४) सन्मा. सौ. ज्योतीताई जि. ठेंगे :– यांनी प्राआउपकेंद्र धनज येथील बांधकामात ब–याच त्रृटि आहे तरी देखील सदर कामांचे देयक सुध्दा अदा केली असल्यांची माहिती दिली.तेंव्हा बांधकामात असलेल्या त्रृटया दुरूस्त करण्यांत याव्यात अशी माहिती सभागृहांस दिली.

यावर मा. सभापती आरोग्य समिती यानी सदर प्रकरणी का.अ क्र.२ यांनी सदर कत्रांटदाराच्या ब–याच तक्रारी आहे तेंव्हा त्यांना काळया यांदी मध्ये टाकण्याबाबत कार्यवाही करावी असे निर्देश दिले

तसचे माझे मतदांर संघांत विद्युती करणाची कामे झाली काय अशी विचारणा करून कामे झाली असल्यांस त्याबाबत मला कुठलीही माहिती दिल्यां जांत नसल्यांचे सांगुन उपकेंद्र कुपटी येथील विद्युतीकरणाचे कामा बाबत मला माहिती दिली नसल्यांचे सांगीतले.

यावर मा. सभापती आरोग्य समिती यानी सदर प्रकरणी का.अ क्र.२ यांनी संबधीत कार्यक्षेत्राातील सन्मा. सदस्यांना कामा संबधी माहिती देण्यांचे निर्देश शा.अ (विद्युत) बा. वि. क्रमांक १/२ यांना दिले.

५) मा. सभापती आरोग्य समिती यांनी :– प्राआकेंद्र/उपकेंद्रात पाण्यांच्या व्यवस्थे बाबत विचारणा केली असता ता.आ.अ दारव्हा व महागांव यांनी अनुक्रमे प्राआकेंद्र मागकिंन्ही व महागांव येथे पाण्याची व्यवस्था नसल्यांचे सांगीतले. असता यावर . मा. सभापती आरोग्य समिती यांनी सदर ठिकाणी पाणीपुरवठयांची त्वरीत व्यवस्था करण्यांचे निर्देश शा.अ. (विद्युत) बा. वि. क्रमांक १ यांना दिले.

तसेच प्राआकेंद्र सिरसगांव येथील पाणीपुरवठयांचे प्राकलन आजचे सभेत मंजुर करण्यांचे निर्देश शा.अ बा. वि. क्रमांक २ व नियोजन शाखा,आरोग्य विभागांस मा. सभापती आरोग्य समिती यांनी दिले.

त्याचप्रमाणे प्राआकेंद्र धानोरा ता. राळेगांव येथील इमारत गळत असल्यांची माहिती ताआअ राळेगांव यांनी सभागृहांत सादर केली असता मा. सभापती आरोग्य समिती यांनी सदर प्राआकेंद्राच्या बांधकामाची चौकशी का.अ बांध. वि. क्रमांक १ यांनी करून तसा चौकशी अहवाल सादर करावा व प्राआकेंद्राचे दुरूस्ती बाबत त्वरीत कार्यवाही करावी असे निर्देश शा.अ बां. वि. क्रमांक १ यांना मा. सभापती आरोग्य समिती यांनी दिले.